# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३०   दिनांक 17/02/2023**

-----------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव येथील शिवपवन मंगल कार्यालयास **"पै. सुरेशराव शेळके"** असे नामकरण नाव देणेबाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर** :-

**संदर्भ :-** 1. मा. नगरसेवक श्री. उमेश (गणेश) खंडेराव कवडे, दिनांक 29/9/2022 ची यादी

उपरोक्त विषयानवये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव येथील शिवपवन मंगल कार्यालयास "**पै. सुरेशराव शेळके**" असे नामकरण नाव देणे बाबत मा. नगरसेवक श्री उमेश (गणेश) खंडेराव कवडे यांनी यादी देउन सुचविले आहे.

मा. नगरसेवक श्री उमेश (गणेश) खंडेराव कवडे संदर्भीय पत्र देउन कळविले आहे की, कै. सुरेशराव छबुराव शेळके हे तत्कालीन नगरपरिषदेमध्ये सन 1991 पासून नगरसेवक पदावर होते, तत्कालीन नगरपरिषदेमध्ये ते बांधकाम समितीचे चेअरमन तसेच सन 1997-1998 या वर्षामध्ये "नगराध्यक्ष" म्हणून प्रभावीपणे कामकाज केले आहे. तसेच महानगरपालिकेमध्ये ते दिनांक 1/5/2005 ते 1/9/2006 या कालावधीमध्ये "सभागृह नेता" या पदावर ते कार्यरत होते. नगर शहरामध्ये नामवंत पहिलवान म्हणून त्यांनी आपली कारकीर्द गाजवलेली असुन ते विविध क्षेत्रामध्ये कार्यरत होते.

"नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात त्यांनी नालेगाव येथे धर्मवीर संभाजीराजे व्यापारी संकूल व शिवपवन मंगल कार्यालय अत्यंत कमी कालावधीमध्ये बांधून पूर्ण केले. सदरील दोन्ही वास्तुमुळे महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्नाचे व बेरोजगारांना रोजगार देण्याचे कार्य त्यांनी या माध्यमातुन केले. शहरातीमधील वाडीयापार्क येथे कुस्ती स्पर्धाच्या आयोजनासाठी त्यांनी बहुमोल सहकार्य केलेले आहे. तरुणांना व्यायामाची आवड निर्माण होण्याकरिता नगर शहरातील पहिली दोन मजली व्यायामशाळा त्यांनी बांधली होती. आजही या व्यायामशाळेचा वापर तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात करत आहे.

तरी त्यांचे कार्य व विचार सदैव शहरवासीयांच्या स्मरणात रहावे या दृष्टीने अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव येथील शिवपवन मंगल कार्यालयास "**पै. सुरेशराव शेळके**" यांचे नाव देणेबाबतचा विषय सर्वसाधारण सभेकडे पाठविणेबाबत संदर्भीय पत्र दिले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चॉकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 अंन्वये मा. महासभेस आहे. सदर परिसरास या पूर्वी कोणतेही नाव देण्यात आलेले नाही.

तरी अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव येथील शिवपवन मंगल कार्यालयास "**पै. सुरेशराव शेळके**" असे नामकरण नाव देणे बाबत मा. नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन प्रस्ताव मा. महासभेकडे निर्णयास्तव पाठविणॆस व मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता, अहमदनगर महानगरपालिका श्री ईथापे यांचा अभिप्राय की, वरिल अ प्रमाणे निर्णयार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्तावित कामकाज हे अहमदनगर महानगरपालिका गावठाण हद्दीतील विद्यमान मंगल कार्यालयाचे असल्याने प्रस्तुत कामी महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणॆस हरकत नाही..

यावर मा. उपायुक्त (सा) अहमदनगर महानगरपालिका श्री. डॉ.कुरे साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार मा. महासभेकडे निर्णयास्तव सादर.

यावर मा. आयुक्त अहमदनगर महानगरपालिका डॉ. पंकज जावळे यांची सहमती दर्शक सही असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** पाईपलाईन रोड भागातील पाणीपुरवठयाचे अधिकारी यांना बोलवा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** परवा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौथरा उभारणीबाबत भुमीपुजन कार्यक्रम आहे आपण सर्वांनी कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित रहावे हि विनंती.

**मा.सौ.दिपाली बारस्कर** :- सर्व पाईपलाईन रोड व बोल्हेगांव येथील संपुर्ण पाणीपुरवठा विस्कळीत आहे.

**श्री.सातपुते, इंजिनिअर पा.पु.** :- मुळाडम वरील 1 पंप बंद होता टाकीतील पाणी घ्यायचे थांबवले. शटडाउन घेतलेने वसंत टेकडीला पाणी पुरवठा झाला नाही.

**मा.सौ.दिपाली बारस्कर** :- वसंतटेकडी टाकीवर कालच पाहणी केली टाकीवरील आटे परत कमी केलेले दिसुन आले मी तुम्हाला बसू देणार नाही पाईपलाईनचा पाणी पुरवठा सुरळीत झाला पाहीजे.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- तुम्ही काहीच कामे करीत नाही मी पत्र दिले आहे.

**श्री.सातपुते, इंजिनिअर पा.पु.** :- संपुर्ण शहराचे पाणीपुरवठ्याला मी जबाबदार नाही. सावेडी भागापुरते नियोजन मी करतो सार्वजनिक वितरण व्यवस्था फक्त मी पाहतो. टाक्या भरल्या की नाही आटे कमी झाले हे मी पहात नाही.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे** :- दरवेळेस टाकीवर जावे लागते आटे कमी कोण करते ते कळाले पाहीजे. नागरिकांचे रोषास आम्हाला सामारे जावे लागते सकाळी 5.00 पासुन फोन चालू होतात. आम्ही वैयक्तीक टँकर चालू केले आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- आमचा जो पर्यंत प्रश्न मार्गी लागत नाही तो पर्यंत विनंती कोणी मध्ये बोलू नये. जोपर्यंत जबाबदार व्यक्ती जबाबदारीने उत्तर देत नाही तोपर्यंत सभा चालू देणार नाही.

**मा.सौ.दिपाली बारस्कर** :- आम्हाला पाणी प्रश्नावर सोल्युशन द्या.

**मा.श्री.गणेश कवडे** :- 17 वॉर्ड मधील एकही वॉर्ड सुखी नाही. सर्वांना पाण्याचा प्रॉब्लेम आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले** :- आज पाणी पुरवठा विभाग प्रमुख नाही ते आल्यानंतर सविस्तर माहिती देतील.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- उद्या आमच्या वॉर्डात मा.आयुक्त, मा.महापौर, मा.उपमहापौर, संबंधित पाणी पुरवठा अधिकारी यांनी वॉर्डात व्हीजीट करावी सर्व कॉलनीत व्हीजीट करावी लागेल. असे आश्वासन द्यावे त्याशिवाय आम्ही खाली बसणार नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले** :- 19 किंवा 20 तारखेला येवू. शनिवार, रविवार छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे भुमिपुजन नियोजीत आहे.

**मा.महापौर मॅडम** : निकम साहेबांना येवू द्या आपण 20 तारखेला पाहणी करु.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** मागच्या मिटींग मध्येच पाणी पुरवठा योजनाचे किरकोळ काम राहीले आहे अशी माहिती दिली. परंतु अजून काम पूर्ण झाले नाही. संपूर्ण शहरास वेठीस धरले जात आहे. पंप येण्याची मुदत 10 जानेवारी पर्यंत होती. 10 फेब्रुवारी झाली तरी अजुन पंप आले नाही. पंप आले का ? कोणाचा श्रेय घेण्याचा प्रश्न आहे का. पाणी का येत नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** श्रेयासाठी आम्ही काही करत नाही त्यासाठी पब्लीकला वेठीस धरत नाही.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** अमृत योजनेत मा.आयुक्तांनी लक्ष घालावे.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** वॉर्ड क्रमांक 15 मध्ये ही पाणी येत नाही.

**श्री.गाडळकर, इंजिनिअर :-** अमृत पाणीपुरवठा योजनेचे पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. पंप चाचणी झाली मोटर चाचणी या महिना अखेर होईल. त्यानंतर 4-5 दिवसात पाणी पुरवठा सुरळीत होईल.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** सर्व कामे कैंव्हा पुर्ण होतील.

**श्री.गाडळकर, इंजिनिअर :-** मार्च अखेर सर्व कामे पुर्ण होतील.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मनुष्यबळ कमी आहे म्हणतात. 175 पदे भरणार होते त्याची माहिती द्या.

**मा.आयुक्त श्री.जावळे साहेब :-** 175 पदे भरण्यासाठी प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर केला आहे. मा.शासनाकडून प्रस्तावास मंजूरी मिळाली आहे. टीसीएस च्या माध्यमातुन पदे भरण्यांत येतील.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-**मानधनावरी काम करणा-या कर्मचा-यांचा विचार होणार आहे का ?

**मा.श्री.कुमार वाकळे :-** परभणी महानगरपालिकेतील मानधनावरील कर्मचा-यांना महानगरपालिकेने कायम सेवेत घेतले. त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेत निर्णय घ्यावा.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** आपल्याकडील आज कार्यरत कर्मचा-यांचे वय झालेले आहे. वयोमर्यादा ओलांडल्यामुळे इतर ठिकाणीही त्यांना नोकरी लागू शकत नाही त्यामुळे सध्या कार्यरत मानधनावरील कर्मचारी यांचा विचार नविन भरतीत करण्यांत यावा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** त्यांना कामाचा अनुभव आहे. नविन कर्मचारी घेतल्यानंतर त्यांना कामाची माहिती होण्यास वेळ जाईल. आवश्यक असल्यास महानगरपालिकेचा ठराव करु. त्यांना प्राधान्यक्रम द्यावा. त्यांचे अर्धे आयुष्य येथे गेले आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** आयुक्तांनी या बाबत पॉझिटीव्ह विचार करुन या लोकांना कसे घेता येईल हे तपासुन पहावे त्यांचे काम करण्याचा प्रयत्न करावा.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :-** मानधनावरील महानगरपालिकेकडील कर्मचा-यांचा विचार करु.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** कच-याची विल्हेवाट लावण्याची सोय करण्यांत यावी.

मा.महापौर मह्वम :- विषय क्रमांक 30 चे वाचन करा.

वाचन केले.

**मा.श्री.गणेश कवडे :-** नामकरणाचे विषय मंजूर करा.

**मा.महापौर मह्वम :-** विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव येथील शिवपवन मंगल कार्यालयास **"पै. सुरेशराव शेळके"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत

आहे. सदर ठिकाणी नावाचा नामफलक लावणेस व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.उमेश गणेश खंडेराव कवडे

अनुमोदक : मा.सौ.सुवर्णा संजय गेनप्पा,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३१ दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरामध्ये महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मध्ये जिल्हा क्रीडा विभागामार्फत खुली व्यायामशाळा (ओपन जीम) बसविणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर** :-

**संदर्भ** :- 1. मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप यांचे जा.क्रं.2827/7/22 दिनांक . 14/12/2022 ची यादी

जा.क्र.२८२९/९/२०२२ दि.०५/१२/२०२२ चे मा.महापौर व मा.उपमहापौर यांनी दिलेले पत्र.

2. मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचे

जा.क्रं. 262 दिनांक . 08/12/2022 चे मा.आयुक्त यांना दिलेले पत्र.

वरिल संदर्भांकित विषयान्वये कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील खालील ठिकाणी खुली व्यायामशाळा (ओपन जीम) साहित्य बसविणेबाबत मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब व मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी संदर्भीय पत्र देवून मा.जिल्हा क्रीडाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर शहरामध्ये महानगरपालिकेच्या ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) खालील ठिकाणी बसविणेबाबत पत्र दिलेले आहे.

| अ.नं. | कामाचे नांव |
|---|---|
| 1 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 01 मधील लेखानगर, दत्तमंदिर ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 2 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 01 मधील भिस्तबाग सर्व्हे नंबर 10 मधील कसबे वस्ती येथील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 3 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 02 मधील शिवनगर येथील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |

| अ.नं. | कामाचे नांव |
|---|---|
| 4 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 04 मधील नवलेनगर, सावेडी येथील सर्व्हे नंबर 80 मध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 5 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 04 मधील सावेडी नरहरी नगरयेथील गट नंबर39/1अ2, सर्व्हे नंबर 146 ब 1 मधील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 6 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 04 तारकपूर बसस्थानक समोरील द कोर्ट यार्ड बिल्डींग परिसरातील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 7 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 07 मधील संभाजी नगर, बोल्हेगांव गावठाण येथे खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 8 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 14 मधील सारसनगर येथील कपिलेश्वर कॉलनी येथील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 9 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील काटवन खंडोबा रोड आयुर्वेद कॉर्नर येथे खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 10 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव गावठाण येथील सिटी सर्व्हे नंबर 1651, जुना सर्व्हे नंबर420 येथील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 11 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 16 मधील लिंक रोड साईनगर येथील केडगांव सर्व्हे नंबर53/1+2येथीलओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 12 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 14 मधील फुलसौंदर मळा, येथील वसंत विहार मधील सर्व्हे नंबर369/4ब पैकी येथील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |
| 13 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 14 मधील साई नगर येथील साई उद्यान सर्व्हे नंबर 363/1 व 2 व 3 व 4/364/1 व 2/365/366/1 व 2 3/367 येथील ओपन स्पेसमध्ये खुली व्यायामशाळा (ओपन जीम) उभारणे |

तरी मा.जिल्हा क्रीडाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत वरील ठिकाणी ओपन जीम साहित्य बसविणेबाबत मा.महासभेचा ठराव आवश्यक असल्यामुळे सदरील प्रस्ताव मा.महासभेकडे मंजुरीसाठी पाठविणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा** :-

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले** :- विषय मंजूर करा.

**मा.महापौर मद्यम** :- विषय मंजूर.

**ठराव** :

ऑफीस रिपोर्ट मंजूर. प्रस्तावात नमुद अहमदनगर महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मध्ये जिल्हा क्रीडा विभागामार्फत खुली व्यायामशाळा (ओपन जीम) बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले,

अनुमोदक : मा.श्री.प्रकाश बाबुराव भागानगरे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३२ दिनांक 17/02/2023**

---------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** व्यायाम शाळा विकास योजना (सर्वसाधारण) अंतर्गत व्यायामसाहित्य पुरविणे सर्वसाधारण सभेमध्ये ठराव मंजूर करणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप यांचे जा.क्र.67/12/23 दि.30/01/2023 रोजीचे पत्र.

मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप यांचे जा.क्र.66/11/23 दि.30/01/2023 रोजीचे पत्र.

मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर अहमदनगर महानगरपालिका यांचे जा.क्रं.283 दिनांक 31/01/2023 रोजीचे पत्र.

वरिल विषयान्वये कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील व्यायामशाळा विकास योजना (सर्वसाधारण) अंतर्गत खालील ठिकाणी व्यायाम साहित्य पुरविणेसाठी मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब यांनी मा.महापौर, मा.आयुक्त व मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी संदर्भीय पत्र देवून जिल्हाधिकारी अहमदनगर मा.जिल्हा क्रीडाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर शहरामधील बंदिस्त हॉलमध्ये व्यायाम साहित्य पुरविणे बाबत खालील ठिकाणचे पत्र दिलेले आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| 1 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.3 मधील नवीद कॉम्प्लेक्स येथील ओपन स्पेस हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |
| 2 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.14 मधील समता कॉलनी अंतर्गत ओपन स्पेस हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |
| 3 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.4 मधील नीलशंकर कॉलनी, योगभवन येथील ओपन स्पेस हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |

तरी मा.जिल्हाधिकारी, मा.जिल्हा क्रीडा अधिकारी अहमदनगर यांचेमार्फत वरील ठिकाणी बंदीस्त हॉलमध्ये व्यायाम साहित्य पुरविणेकामी मा.महासभेचा ठराव आवश्यक असल्यामुळे सदरील प्रस्ताव मा.महासभेकडे मंजुरीसाठी पाठविणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे

यावर मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** विषय मंजूर करा.

**मा.महापौर मडम :-** विषय मंजूर.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मधील हॉल मध्ये व्यायाम शाळा विकास योजना (सर्वसाधारण) अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी अहमदनगर यांचे मार्फत व्यायाम साहित्य बसविणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले,

अनुमोदक : मा.श्री.प्रकाश बाबुराव भागानगरे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३३ दिनांक 17/02/2023**

-------------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** दलितवस्ती व्यायामशाळा विकास योजने अंतर्गत व्यायाम शाळेस व्यायाम साहित्य पुरविणेसाठी प्रस्तावित करणेबाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा विषय :-** दलितवस्ती व्यायामशाळा विकास योजने (सर्वसाधारण) अंतर्गत व्यायामशाळेस व्यायामसाहित्य पुरविणे साठी प्रस्तावीत करणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकूर :-**

संदर्भ:1.मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप यांचे जा.क्र.62/7/23 दि.30/01/2023 रोजीचे पत्र.

2.मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप यांचे जा.क्र.61/6/23 दि.30/01/2023 रोजीचे पत्र.

3.मा.आ.श्री.संग्राम अरुणकाका जगताप यांचे जा.क्र.63/8/23 दि.30/01/2023 रोजीचे पत्र.

4.मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर अहमदनगर महानगरपालिका यांचेजा.क्रं.282 दिनांक 31/01/2023 रोजीचे पत्र.

वरिल विषयान्वये कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील खालील ठिकाणी दलितवस्ती व्यायामशाळा विकास योजने अंतर्गत व्यायाम साहित्य पुरविणेसाठी मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब यांनी मा.महापौर, मा.आयुक्त व मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले, उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका यांनी संदर्भीय पत्र देवून जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर शहरामधील बंदिस्त हॉलमध्ये व्यायाम साहित्य पुरविणे बाबत खालील ठिकाणचे पत्र दिलेले आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| 1 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.1 मधील डॉन बॉस्को येथील ओपन स्पेस मधील हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |
| 2 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.7 मधील बौध्दवस्ती बोल्हेगांव गावठाण येथील ओपन स्पेस मधील हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |

| | |
|---|---|
| 3 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.9 मधील हरीजन वस्ती येथील ओपन स्पेस मधील हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |
| 4 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.13 मधील क्षेत्रेचाळ येथील ओपन स्पेस मधील हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |
| 5 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.कं.17 मधील इंदिरानगर, केडगांव येथील ओपन स्पेस मधील हॉलमध्ये व्यायाम साहित्य (Indoor Gym) पुरविणे |

तरी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत वरील ठिकाणी बंदीस्त हॉलमध्ये व्यायाम साहित्य पुरविणेकामी मा.महासभेचा ठराव आवश्यक असल्यामुळे सदरील प्रस्ताव मा.महासभेकडे मंजुरीसाठी पाठविणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे

यावर मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

चर्चा :-

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** विषय मंजूर करा.

**मा.महापौर महोदय :-** विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मधील बंदीस्त हॉलमध्ये दलितवस्ती व्यायामशाळा विकास योजने अंतर्गत मा.जिल्हा क्रीडाधिकारी, अहमदनगर यांचे मार्फत व्यायाम शाळेस व्यायाम साहित्य पुरविणेसाठी प्रस्तावित करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले,

अनुमोदक : मा.श्री.प्रकाश बाबुराव भागानगरे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06     प्रस्ताव क्रमांक : ३४     दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी या भागातील सांस्कृतिक भवनास **"राजमाता जिजाऊ मॉ साहेब सांस्कृतिक भवन"**असे नामकरण करणे बाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** मा. नगरसेवक श्री.विनीत नाथ पाअुलबुधे, यांचे दिनांक 02/02/2023 रोजीची यादी

उपरोक्त विषयानवये रिपोर्ट सादर की, मा.नगरसेवक श्री.विनीत नाथ पाअुलबुधे, यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 2 मधील एस.टी.कॉलनी सुर्यनगर सावेडी येथील ओपनस्पेस मध्ये मा.आ.सग्राम भैय्या जगताप यांचे स्थानिक विकास निधीतुन सांस्कृतिक भवन उभारण्यांत आलेले आहे. तरी या सांस्कृतिक भवनाचे **"राजमाता जिजाउ मॉ साहेब सांस्कृतिक भवन"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक 2 मधील सावेडी या भागातील सांस्कृतिक भवनास **"राजमाता जिजाऊ मॉ साहेब सांस्कृतिक भवन"** असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावित नमूद नुसार प्र.क्र.2 मधील सावेडी येथील सांस्कृतिक भवनास नामकरण करणेचा विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणे उचीत वाटते.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

चर्चा :-

**मा.श्री.विनीत पाअ◌ुलबुधे :-** प्रभाग क्रमांक 1 नाही प्रभाग क्रमांक 2 आहे दुरुस्त करा. विषय मंजूर करा.

**मा.महापौर मडम :-** विषय मंजूर करा.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 2 मधील एस.टी.कॉलनी, सुर्यनगर, सावेडी या भागातील महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मधील सांस्कृतिक भवनास **"राजमाता जिजाऊ मॉ साहेब सांस्कृतिक भवन"**असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर ठिकाणी नांव देणेस व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.विनीत नाथ पाअ◌ुलबुधे,

अनुमोदक : मा.सौ.रुपाली निखील वारे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३५ दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक १५ कल्याण रोड परिसरातील नालेगांव येथील स.नं.३३/१,३३/२,३४,३५ या ले आउट मधील ओपन स्पेस क्षेत्रफळ ५२२०.०० चौ.मी. यांचे नामकरण **"प्राचार्यरत्न खासेराव शितोळे क्रीडा संकुल"** असे नामकरण करणे बाबत

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ** :-1.मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले, यांचे दि.07/02/2023 रोजीची यादी.

2.मा.नगरसेवक श्री.अनिल माधवराव शिंदे यांचे दिनांक 06/02/2023 रोजीची यादी

3.मा.नगरसेवक श्री.शाम अप्पा किसन नळकांडे यांचे दि.03/02/2023रोजीची यादी

4.मा.नगरसेविका सौ.सुवर्णा दत्ता जाधव यांचे दि.03/02/2023 रोजीची यादी

उपरोक्त विषयानवये रिपोर्ट सादर की, मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले, मा.नगरसेवक श्री.अनिल माधवराव शिंदे, मा.नगरसेवक श्री.शाम अप्पा किसन नळकांडे, .मा.नगरसेविका सौ.सुवर्णा दत्ता जाधव यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक 15 कल्याणरोड परिसरातील नालेगांव येथील स.नं.३३/१,३३/२,३४,३५ या ले आउट मधील ओपन स्पेस क्षेत्रफळ ५२२०.०० चौ.मी. यांचे नामकरण **"प्राचार्यरत्न खासेराव शितोळे क्रीडा संकुल"** असे नामकरण करणे बाबत या भागातील नागरिकांनी निवेदन देवून मा.उपमहापौर श्री.गणेश पुंडलिक भोसले, मा.नगरसेवक श्री.अनिल माधवराव शिंदे, मा.नगरसेवक श्री.शाम अप्पा किसन नळकांडे, .मा.नगरसेविका सौ.सुवर्णा दत्ता जाधव यांच्याकडे भागातील प्र.क्रं.15 कल्याण रोड परिसरातील नालेगांव येथील स.नं.३३/१,३३/२,३४,३५ या ले आउट मधील ओपन स्पेस क्षेत्रफळ ५२२०.०० चौ.मी. यांचे नामकरण **"प्राचार्यरत्न खासेराव शितोळे क्रीडा संकुल"** असे नामकरण करणेबाबत मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

सदर ठिकाणाला बांधकाम विभागाकडे उपलब्ध अभिलेख तपासले असता यापुर्वी नाव दिलेले आढळ होत नाही तरी प्र.क्र.15 कल्याण रोड परिसरातील नालेगांव येथील येथील स.नं.३३/१,३३/२,३४,३५ या ले आउट मधील ओपन स्पेस क्षेत्रफळ ५२२०.०० चौ.मी. यांचे नामकरण **"प्राचार्यरत्न खासेराव शितोळे क्रीडा संकुल"** असे नामकरण करणे बाबत

असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवून व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यास आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावित नमूद नुसार प्र.क्र.15 कल्याण रोड परिसरातील नालेगांव येथील येथील स.नं.३३/१,३३/२,३४,३५ या ले आउट मधील ओपन स्पेस क्षेत्रफळ ५२२०.०० चौ.मी.चे जागेस **"प्राचार्यरत्न खासेराव शितोळे क्रीडा संकुल"** असे नामकरण करणेचा विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.स.न.र. अभिप्रायानुसार व प्रस्तावित रिपोर्टनुसार मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

चर्चा :-

**मा.श्री.शाम किसन नळकांडे :-** विषय मंजूर करा.

**मा.महापौर मह्नम :-** विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १५ कल्याण रोड परिसरातील नालेगांव येथील स.नं.३३/१,३३/२,३४,३५ या ले आउट मधील ओपन स्पेस क्षेत्रफळ ५२२०.०० चौ.मी. या जागेस **"प्राचार्यरत्न खासेराव शितोळे क्रीडा संकुल"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. शाम किसन नळकांडे,
अनुमोदक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३६ दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९, ४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७ व सावेडी स.नं.२५१,२५२,२५३,२५४, २६०,२६१, २७६,२७७, २७८, २७९, २८०, २८१,२८२,२८३,२८४,२८५,२८६,२८७,२८८,२८९,२९०, २९१,२९२,२९३, २९४,२९५,२९६, २९७,२९८,२९९,३००,३०१,३०२,३०३,३०४,३०५,३०६, ३०७, ३०८,३०९,३१०,३११,३१२ हे सर्व स.नं.ची जागा बारस्कर कुटुंबियाचे असल्याने या भागास **"बारस्कर नगर"** असे नामकरण करणे बाबत

---*---

## प्रस्तावाचा मजकुर :-

**संदर्भ** :-मा. नगरसेवक डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे, यांचे दिनांक 15/12/2022 रोजीची यादी

उपरोक्त विषयानवये रिपोर्ट सादर की, मा.नगरसेवक डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे, यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.३०, ३१,३२, ३३, ३४,३५,३६,३७,३८,३९, ४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७ व सावेडी स.नं.२५१,२५२,२५३,२५४, २६०, २६१, २७६,२७७, २७८, २७९, २८०, २८१,२८२,२८३,२८४,२८५, २८६, २८७, २८८,२८९,२९०, २९१,२९२,२९३, २९४,२९५,२९६, २९७,२९८,२९९,३००,३०१,३०२,३०३,३०४, ३०५,३०६, ३०७, ३०८, ३०९,३१०,३११,३१२ या परिसरात नविन अपार्टमेंट, ट्वीन बंगलो तयार होत असुन मोठया प्रमाणात नागरी वसाहत झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. परंतु या भागात नाव नसल्यामुळे बाहेर गावाहुन येणारे व शहरातील, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या भागास **"बारस्कर नगर"** असे नामकरण केल्यास नागरिकांना पत्ता शोधण्यास सोयीस्कर होईल या बाबत विविध स्वयंसेवी संघटना, नागरिक यांनी मा.नगरसेवक डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे यांच्याकडे भागास **"बारस्कर नगर"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे.

सदर प्रस्तावित नामकरण हे रस्ता / चौक/ सार्वजनिक ठिकाण इ.मध्ये मोडत नसुन तो भिस्तबाग उपनगरा पैकी काही भाग आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९, ४०,४१,४२, ४३,४४,४५,४६,४७ व सावेडी स.नं.२५१,२५२,२५३,२५४, २६०,२६१, २७६,२७७, २७८, २७९, २८०, २८१,२८२,२८३,२८४,२८५,२८६,२८७,२८८,२८९,२९०,२९१,२९२,२९३, २९४,२९५,२९६, २९७,२९८, २९९,३००,३०१,३०२,३०३,३०४,३०५,३०६, ३०७, ३०८,३०९,३१०,३११,३१२ भागास **"बारस्कर नगर"** असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावात नमूद सावेडी स.नं.30 ते 47, 251 ते 254, 260 ते 261, 276 ते 312 या भागास नामकरणाचा विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. अभिप्राय व प्रस्तावित रिपोर्ट नुसार निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.सागर बोरुडे :-** विषय मंजूर करा.

**मा.महापौर महोदय :-** विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४१,४२,४३,४४,४५,४६,४७ व सावेडी स.नं. २५१, २५२,२५३,२५४, २६०,२६१, २७६,२७७, २७८, २७९, २८०, २८१,२८२,२८३,२८४,२८५,२८६,२८७, २८८,२८९,२९०,२९१,२९२,२९३,२९४,२९५,२९६,२९७,२९८,२९९,३००,३०१,३०२,३०३,३०४,३०५,३०६, ३०७, ३०८,३०९,३१०,३११,३१२ हे सर्व स.नं. या भागास **"बारस्कर नगर"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर ठिकाणी निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

अनुमोदक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३७ दिनांक 17/02/2023**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी येथील स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नं.६९ ते ५५ समोरील ७.५० मी रुंदीच्या रस्त्यास **"कै. रुख्मिणीबाई काळे आजी मार्ग"** असे नामकरण करणे बाबत..

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-**मा. नगरसेविका रुपालीताई निखील वारे यांचे दिनांक 13/01/2023 रोजीची यादी जा.क्रं.2063 दि.09/02/2023 चे मा.महापौर साहेब यांचे शिफारस पत्र.

उपरोक्त विषयानवये रिपोर्ट सादर की, मा. नगरसेविका रुपालीताई निखील वारे यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी येथील स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नं.६९ ते ५५ समोरील ७.५० मी रुंदीच्या रस्त्यास नविन अपार्टमेंट, ट्वीन बंगलो तयार होत असुन मोठया प्रमाणात नागरी वसाहत झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. परंतु या भागात नाव नसल्यामुळे बाहेर गावाहुन येणारे व शहरातील, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या भागातील हनुमान नगर मंदिर ते डोकेनगर (मुळे एसटीडी) या भागातील रस्यास **"कै रुख्मिणी बाई काळे आजी मार्ग"** असे नामकरण केल्यास नागरिकांना पत्ता शोधण्यास सोयीस्कर होईल या बाबत विविध स्वयंसेवी संघटना, नागरिक यांनी मा.नगरसेविका रुपालीताई निखील वारे यांच्याकडे प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी येथील स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नं.६९ ते ५५ समोरील ७.५० मी रुंदीच्या रस्त्यास **"कै. रुख्मिणीबाई काळे आजी मार्ग"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे..

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी येथील स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नं.६९ ते ५५ समोरील ७.५० मी रुंदीच्या रस्त्यास **"कै. रुख्मिणीबाई काळे आजी मार्ग"**असे नामकरण

करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावित नमूद नुसार सावेडी येथील स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नं.६९ ते ५५ समोरील ७.५० मी रुंदीच्या रस्त्यास नामकरण बाबतचा विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. अभिप्राय व प्रस्तावित रिपोर्ट नुसार प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.रुपाली वारे** :- हा विषय मंजूर करा व तलाठी यांचे माउली संकुल सभागृह आहे. या ठिकाणी विविध कार्यक्रम होतात. या परिसरास **माउली संकुल चौक** असे नाव द्यावे.

**मा.महापौर मह्यम** :- विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी येथील स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नं.६९ ते ५५ समोरील ७.५० मी रुंदीच्या रस्त्यास **"कै. रुख्मिणीबाई काळे आजी मार्ग"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नगरसेविका सौ.रुपाली निखील वारे यांच्या मागणी नुसार सावेडी भागातील माउली संकुल सभागृह असलेल्या चौकास **"माउली संकुल चौक"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.रुपाली निखील वारे,

अनुमोदक : मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06    प्रस्ताव क्रमांक : ३८    दिनांक 17/02/2023**

----------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२५३ व ३०८ या भागातील चौकास **राजवीर चौक** असे नामकरण करणे बाबत..

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर** :-

**संदर्भ** :- मा.नगरसेवक डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे यांचे दिनांक 15/12/2022 रोजीची यादी

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की, मा.नगरसेवक डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२५३ व ३०८ या परिसरात नविन अपार्टमेंट, ट्वीन बंगलो तयार होत असुन मोठया प्रमाणात नागरी वसाहत झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. परंतु या भागात नाव नसल्यामुळे बाहेर गावाहुन येणारे व शहरातील, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या भागातील चौकास **"राजवीर चौक"** असे नामकरण केल्यास नागरिकांना पत्ता शोधण्यास सोयीस्कर होईल या बाबत विविध स्वयंसेवी संघटना, नागरिक यांनी मा.नगरसेवक डॉ.सागर अर्जुन बोरुडे यांच्याकडे भागातील चौकास **"राजवीर चौक"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे..

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्र.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२५३ व ३०८ या भागातील चौकास **"राजवीर चौक"** असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावामध्ये नमूद नुसार प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२५३ व ३०८ या भागातील चौकास नामकरण बाबतचा विषय मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. अभिप्राय व प्रस्तावित रिपोर्ट नुसार प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा** :-

**मा.श्री.सागर बोरुडे** :- विषय मंजूर करा.

**मा.महापौर महोदय** :- विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव** :

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२५३ व ३०८ या भागातील चौकास **"राजवीर चौक "** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

अनुमोदक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ३९ दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२४०,२४१,२४२,२४३,२४४,२४५,२४६, २४७,२४८,२४९,२५०,२६५,२६६,२६७,२६८,२६९,३१४,३१५,३१६,३१७,३१८,३१९,३२० व भिस्तबाग स.नं.२६ या भागास **संघर्ष नगर** असे नामकरण करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांचे दिनांक 15/12/2022 रोजीची यादी

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की, मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२४०,२४१,२४२, २४३,२४४,२४५,२४६,२४७,२४८,२४९,२५०,२६५,२६६,२६७,२६८,२६९,३१४,३१५,३१६,३१७,३१८, ३१९,३२० व भिस्तबाग स.नं.26 या परिसरात नविन अपार्टमेंट, ट्वीन बंगलो तयार होत असुन मोठया प्रमाणात नागरी वसाहत झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. परंतु या भागात नाव नसल्यामुळे बाहेर गावाहुन येणारे व शहरातील, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या भागाला **"संघर्ष नगर"** असे नामकरण केल्यास नागरिकांना पत्ता शोधण्यास सोयीस्कर होईल या बाबत विविध स्वयंसेवी संघटना, नागरिक यांनी मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांच्याकडे **"संघर्ष नगर"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे.

सदर प्रस्तावित नामकरण हे रस्ता चौक सार्वजनिक ठिकाण इ. मध्ये मोडत नसुन तो भिस्तबाग उपनगरापैकी काही भाग आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२४०,२४१,२४२,२४३,२४४,२४५,२४६, २४७,२४८, २४९,२५०,२६५,२६६,२६७,२६८,२६९,३१४,३१५,३१६,३१७,३१८,३१९,३२० व भिस्तबाग स.नं.२६ या भागास **"संघर्ष नगर"** असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग

यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावामध्ये नमूद नुसार प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.240, ते 250, 266 ते 269, 315 ते 320 व भिस्तबाग स.नं.26 या भागाचे नामकरण बाबतचा विषय मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. अभिप्राय व प्रस्तावित रिपोर्ट नुसार प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.संपत बारस्कर** :- विषय मंजूर करा.

**मा.महापौर महम** :- विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी स.नं.२४०,२४१,२४२,२४३,२४४,२४५,२४६,२४७,२४८,२४९,२५०,२६५,२६६,२६७,२६८,२६९,३१४, ३१५,३१६,३१७,३१८,३१९,३२० व भिस्तबाग स.नं.२६ या भागास **"संघर्ष नगर"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

अनुमोदक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ४० दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.१,२,८,९,१०,११ व १२ या भागास **कसबे नगर** असे नामकरण करणे बाबत..

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर** :-

**संदर्भ** :- मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांचे दिनांक 15/12/2022 रोजीची यादी

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की, मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.१,२,८,९,१०,११ व १२ या परिसरात नविन अपार्टमेंट, ट्वीन बंगलो तयार होत असुन मोठया प्रमाणात नागरी वसाहत झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. परंतु या भागात नाव नसल्यामुळे बाहेर गावाहुन येणारे व शहरातील, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या भागाला **"कसबे नगर"** असे नामकरण केल्यास नागरिकांना पत्ता शोधण्यास सोयीस्कर होईल या बाबत विविध स्वयंसेवी संघटना, नागरिक यांनी मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांच्याकडे **"कसबे नगर"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे.

सदर प्रस्तावित नामकरण हे रस्ता चौक सार्वजनिक ठिकाण इ. मध्ये मोडत नसुन तो भिस्तबाग उपनगरापैकी काही भाग आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.१,२,८,९,१०,११ व १२ या भागास **"कसबे नगर"** असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावामध्ये नमूद नुसार प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.१,२,८,९,१०,११ व १२ या भागाचे नामकरण बाबतचा विषय मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. अभिप्राय व प्रस्तावित रिपोर्ट नुसार प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.संपत बारस्कर :-** विषय क्रमांक 40 मध्ये दुरुस्ती करण्यांत यावी. टायपिंग मिस्टेक मध्ये कजबे झाले आहे त्याचे "कसबेनगर" ऐवजी "कजबेनगर" अशी दुरुस्ती करण्यांत यावी. विषय मंजूर करा.

**मा.महापौर मह्रम :-** विषय मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**चर्चा :-**

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :-** नामकरणाचे सर्व विषय मंजूर करावेत.

**मा.महापौर मह्रम :-** नामकरणाचे सर्व विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील भिस्तबाग स.नं.१,२,८,९,१०,११ व १२ या भागास **"कसबे नगर"** अशी टायपिंग चूक झाली असुन त्याऐवजी **"कजबे नगर"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,
अनुमोदक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06   प्रस्ताव क्रमांक : ४१   दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक ७ मधील नागापुर स.नं.१०,११ व १२ या भागास **बाजीराव कातोरे पाटील नगर** असे नामकरण करणे बाबत..

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर** :-

**संदर्भ** :- मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांचे दिनांक 15/12/2022 रोजीची यादी

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की, मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ७ मधील नागापुर स.नं.१०,११ व १२ या परिसरात नविन अपार्टमेंट, ट्वीन बंगलो तयार होत असुन मोठया प्रमाणात नागरी वसाहत झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. परंतु या भागात नाव नसल्यामुळे बाहेर गावाहुन येणारे व शहरातील, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या भागाला **"बाजीराव कातोरे पाटील नगर"** असे नामकरण केल्यास नागरिकांना पत्ता शोधण्यास सोयीस्कर होईल या बाबत विविध स्वयंसेवी संघटना, नागरिक यांनी मा.नगरसेवक श्री.संपत विजय बारस्कर यांच्याकडे **"बाजीराव कातोरे पाटील नगर"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे.

सदर प्रस्तावित नामकरण हे रस्ता चौक सार्वजनिक ठिकाण इ. मध्ये मोडत नसुन तो भिस्तबाग उपनगरापैकी काही भाग आहे.

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक १ मधील नागापुर स.नं.१०,११ व १२ या भागास **"बाजीराव कातोरे पाटील नगर"** असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावामध्ये नमूद नुसार प्रभाग क्रमांक 7 मधील नागापुर स.नं.१०,११ व १२ या भागाचे नामकरण बाबतचा विषय मा.महासभेकडे निर्णयास्तव घेणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. अभिप्राय व प्रस्तावित रिपोर्ट नुसार प्रस्ताव मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.संपत बारस्कर :-** विषय मंजूर करा.

**मा.महापौर मडम :-** विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ मधील नागापुर स.नं.१०,११ व १२ या भागास **"बाजीराव कातोरे पाटील नगर"** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

अनुमोदक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ४२ दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नंबर ८४ ते २९४ व ८५ ते १०४ येथील हनुमान मंदिर ते डोके नगर (मुळे एस.टी.डी.) या रस्त्यास **लोकनेते कै.गोपीनाथजी मुंडे मार्ग** असे नामकरण करणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-**मा. नगरसेविका रुपालीताई निखील वारे यांचे दिनांक 13/01/2023 रोजीची यादी

उपरोक्त विषयानवये रिपोर्ट सादर की, मा. नगरसेविका रुपालीताई निखील वारे यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नंबर ८४ ते २९४ व ८५ ते १०४ या परिसरात नविन अपार्टमेंट, ट्वीन बंगलो तयार होत असुन मोठया प्रमाणात नागरी वसाहत झालेल्या आहेत. त्यामुळे या भागात मोठया प्रमाणात लोकवस्ती वाढत आहे. परंतु या भागात नाव नसल्यामुळे बाहेर गावाहुन येणारे व शहरातील, मित्रपरिवार यांना पत्ता शोधण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या भागातील हनुमान नगर मंदिर ते डोकेनगर (मुळे एसटीडी) या भागातील रस्यास **"लोकनेते कै.गोपीनाथजी मुंडे मार्ग"** असे नामकरण केल्यास नागरिकांना पत्ता शोधण्यास सोयीस्कर होईल या बाबत विविध स्वयंसेवी संघटना, नागरिक यांनी मा.नगरसेविका रुपालीताई निखील वारे यांच्याकडे प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नंबर ८४ ते २९४ व ८५ ते १०४ येथील हनुमान मंदिर ते डोके नगर (मुळे एस.टी.डी.) या रस्त्यास **"लोकनेते कै.गोपीनाथजी मुंडे मार्ग"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे..

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नंबर ८४ ते २९४ व ८५ ते १०४ येथील हनुमान मंदिर ते डोके नगर (मुळे एस.टी.डी.) या रस्त्यास **"लोकनेते कै.गोपीनाथजी मुंडे मार्ग"**असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावित नमूद नुसार निर्मलनगर सावेडी स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नंबर ८४ ते २९४ व ८५ ते १०४ भागातील रस्त्यास नामकरण बाबतचा विषय मा.महासभेपुढे निर्णयास्तव पाठविणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. अभिप्राय व प्रस्तावित रिपोर्ट नुसार प्रस्ताव मा.महासभेपुढे निर्णयास्तव सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.रुपाली वारे :-** विषय मंजूर करा.

**मा.महापौर मह्रम :-** विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २ मधील निर्मलनगर सावेडी स.नं.५९/२ब+६०+६१ मधील प्लॉट नंबर ८४ ते २९४ व ८५ ते १०४ येथील हनुमान मंदिर ते डोके नगर (मुळे एस.टी.डी.) या रस्त्यास **लोकनेते कै.गोपीनाथजी मुंडे मार्ग** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.रुपाली निखील वारे,

अनुमोदक : मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06 प्रस्ताव क्रमांक : ४३ दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी या भागातील प्रशांत मेडीकल चौक पाईपलाईन रोड येथील चौकास **कै.शंकर भाऊ वाणी चौक** असे नामकरण करणे बाबत..

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** मा.नगरसेवक डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे यांचे दिनांक 03/02/2022 रोजीची यादी

उपरोक्त विषयान्वये रिपोर्ट सादर की, मा.नगरसेवक डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे यांनी यादी देवून अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी या भागातील प्रशांत मेडीकल चौक पाईपलाईन रोड येथील चौकास **"कै.शंकर भाऊ वाणी चौक"** असे नामकरण करण्याची मागणी केलेली आहे..

उपरोक्त प्रस्ताव मंजुरीसाठी महानगरपालिका अधिनियमामध्ये तरतुद खालील प्रमाणे आहे.

1. कलम 457 मधील अ.क्रं.10 क नुसार रस्त्यांना आणि सार्वजनिक ठिकाणांना नावे देणे किंवा क्रमांक देणे आणि (जागांना क्रमांक देणे) या बाबीसाठी नियम करता येईल.

2. अनुसूची ड प्रकरण 11 मधील 2 रस्त्यांना नावे देणे आणि जागांना क्रमांक देणे 1 अ महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिकेमध्ये निहीत असलेल्या कोणत्याही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण ज्या नावाने किंवा तो क्रमांक ओळखण्यात येईल. ते नाव किंवा तो क्रमांक ठरवता येईल.

तरी प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी या भागातील प्रशांत मेडीकल चौक पाईपलाईन रोड येथील चौकास **"कै.शंकर भाऊ वाणी चौक"** असे नामकरण करण्यास मा.सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवुन व सदरचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यांस आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक संचालक नगररचना विभागाकडुन अभिप्राय की, प्रस्तावामध्ये नमूद नुसार सावेडी पाईपलाईन रोड येथील चौकास नामकरणाचा विषय मा.महासभेकडे निर्णयास्तव ठेवणे उचीत आहे.

यावर शहर अभियंता श्री.निंबाळकर यांचा अभिप्राय की, मा.स.सं.न.र. ना हरकत अभिप्राय व प्रस्तावानुसार मा.महासभेकडे पाठविणेस सादर.

यावर उपायुक्त कर श्री.डांगे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त डॉ.श्री.पंकज जावळे साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-**

**मा.श्री.सागर बोरुडे :-** विषय मंजूर करा.

**मा.महापौर महोदय :-** विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ मधील सावेडी या भागातील प्रशांत मेडीकल चौक पाईपलाईन रोड येथील चौकास **कै.शंकर भाऊ वाणी चौक** असे नामकरण नाव देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

अनुमोदक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका-06** **प्रस्ताव क्रमांक :** ४४ **दिनांक 17/02/2023**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मूळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी शासनामार्फत डी.पी.युनिट मागविणे, इरादा जाहीर करणे व नगररचना अधिकारी यांची नियुक्ती करणे बाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकूर :-**

संदर्भ : श्री.योगेश डी. आरोटे यांचेकडील प्राप्त पत्र दिनांक 25/08/2022 अन्वये.

अहमदनगर नगरपरिषदेची स्थापना 1854 साली झालेली असून 30 जून 2003 रोजीपासून अहमदनगर महानगरपालिका म्हणुन कार्यरत असुन मूळ हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/07/2005 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे व दिनांक 22/08/2005 पासून अंमलात आलेला आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेची दिनांक 01 जुलै 1999 रोजी हद्दवाढ झालेली असुन अहमदनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/04/2012 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे. व दिनांक 05/05/2012 पासून अंमलात आलेला आहे.

सबब अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्दीतील क्षेत्राचा मंजूर विकास आराखडा अंमलात येवून दिनांक 22/08/2022 रोजी 17 वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला असल्याने शासन निर्देश जा.क्रं.टीपीएस 1810/83 प्र.क्र.2115/2010 नवि-13 दिनांक 02/02/2012 अन्वये ज्या विकास योजना अंमलात येवून 17 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे अशा सर्व नियोजन प्राधिकरणांच्या सुधारीत विकास योजना भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे द्दतगती पध्दतीने तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक टीपीएस-1818/1489/प्र.क्रं.303/18 नवि-13 दिनांक 25/01/2019 शुध्दीपत्रक 17/06/2019 अन्वये निर्गमीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक टीपीएस-1818/1647/प्र.क्रं.252/18 नवि-13 दिनांक 15/10/2018 रोजीच्या शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्द + वाढीव हद्द विकास योजना मंजूरीच्या तारखेमध्ये व वर्षामध्ये बदल पडलेला असतो

त्यामुळे दोन्ही क्षेत्राच्या मंजूर विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही करतांना 17 वर्षाचा कालावधी पुर्ण होण्याची तारीख व वर्ष वेगवेगळे असते.

त्यामुळे अशा मुळ वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रीया देखील वेगवेगळया वेळी सुरु करण्यांत येते. मुळ व वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही दोन टप्प्यात करतांना विकास योजना प्रस्तावांचे नियोजन करतेवेळी ब-याच अडचणी येवू शकतात व ते नियोजन देखील योग्य प्रकारे होवू शकत नाही. सबब नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्रात मुळ व वाढीव हद्द अशा दोन भागात विकास योजना मंजूर असल्यास पैकी कोणत्याही एका क्षेत्राची विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही सुरु करतांना दुस-या क्षेत्राची विकास योजना देखील त्यासोबतच सुधारीत करणेची कार्यवाही झाल्यास, अशी एकत्रीतपणे विकास योजना सुधारीत करतांना नियोजन प्राधिकरणाच्या संपूर्ण क्षेत्राचा विचार होवून विकास योजना प्रस्तावाचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे होवू शकेल व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्प्यावर आणता येईल या बाबीचा विचार करुन राज्यातील सर्वच नियोजन प्राधिकरणांना उक्त अधिनियमाचे कलम 154 अन्वये खालील प्रमाणे निर्देश देण्यांत आलेले आहेत.

राज्यातील सर्व महानगरपालिका /नगरपरिषदा /नगरपंचायती /विशेष नियोजन प्राधिकरणे अथवा अन्य नियोजन प्राधिकरणे यांनी क्षेत्रात जर मुळ व वाढीव हद्दे क्षेत्राच्या अशा दोन भागात विकास योजना मंजूर असतील तर अशा मंजूर विकास योजनांपैकी कोणत्याही एका भागाची विकास योजना मंजूर होवून अंमलात आल्याच्या दिनांकापासून 20 वर्षे पुर्ण होण्यापूर्वी 3 वर्षे अगोदर त्या भागांची विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया सुरु करतांना त्यावेळी नियोजन प्राधिकरणाच्या संपूर्ण क्षेत्राचा विचार होवून विकास योजना प्रस्तावांचे नियोजन अधिक चांगल्याप्रकारे करणे शक्य व्हावे व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करण्याची कार्यवाही एकाच टप्प्यावर होण्याच्या दृष्टीने जरी दुस-या भागाची विकास योजना मंजूर होवून अंमलात आल्याच्या दिनांकापासुन कितीही कालावधी झालेला असेल तरीदेखील अशा नियोजन प्राधिकरणांनी संबंधित दोन्ही भागांच्या विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया एकत्रितपणे हाती घ्यावी.

त्याप्रमाणे सदरची कार्यवाही ही खाजगी संस्थेमार्फत करुन घेणे आवश्यक असल्याने अहमदनगर महानगरपालिका मे.स्थायी समिती सभा क्रमांक 5 विषय क्रमांक 74 दिनांक 28/12/2020 नुसार कामाची निश्चीती व मंजूरी प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेकरीता विद्यमान जमीन वापर (Existing Land Use) चे सर्व्हेक्षण खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यांत आले असून सदर काम अंतिम टप्प्यात

असून अस्तीत्वातील जमीन वापर नकाशा तयार करुन सादर केलेला आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21(2) च्या अनुषंगाने कलम 23(1) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्राकरीता सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23(2) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील सुधारीत योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व सहाय्यक संचालक नगररचना यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, अहमदनगर महानगरपालिका कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यांत यावा.

सुधारीत विकास योजना तयार करण्याचा महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सुचनेव्दारे प्रसिध्द करण्यांत यावा. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून 60 दिवसांच्या कालावधीत प्राप्त होणा-या नागरिकांच्या सूचना / हरकतींचा विचार, सुधारीत विकास योजना तयार करतांना करण्यांत यावा.

तसेच सुधारीत विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करणेकरीता त्या क्षेत्राचे सुधारीत विकास योजनेचे प्रस्ताव तयार करणेकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" यांची नेमणूक करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. "नगररचना अधिकारी" यांच्या नेमणूकीस मा.सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांची पूर्व मंजूरी घेण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी व त्यांनी मंजूरी दिल्यानंतर "नगररचना अधिकारी" यांच्या नियुक्तीचे औपचारीक आदेश, आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी पारीत करावे.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने विकास योजना तयार करणेकरीता शासनामार्फत विकास योजना कार्यालय (डी.पी.युनिट) मागविणे.

त्याअनुषंगाने सदर वरील विषय धोरणात्मक असल्याने धोरणात्मक निर्णयासाठी मा.महासभेपुढे मंजूरीस्तव सादर करणेकरीता आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

विषय क्रमांक 44 चे वाचन करण्यांत यावे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** या विषयाची माहिती सभागृहाला द्यावी नेमके आपण काय करणार आहात.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** अहमदनगर नगरपरिषदेची स्थापना 1854 साली झालेली असून 30 जून 2003 रोजीपासून अहमदनगर महानगरपालिका म्हणुन कार्यरत असुन मूळ हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/07/2005 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे व दिनांक 22/08/2005 पासून अंमलात आलेला आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेची दिनांक 01 जुलै 1999 रोजी हद्दवाढ झालेली असुन अहमदनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/04/2012 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे. व दिनांक 05/05/2012 पासून अंमलात आलेला आहे. दिनांक 15/10/2010 चे शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्द + वाढीव हद्द विकास योजना मंजूरीच्या तारखेमध्ये व वर्षामध्ये बदल पडलेला असल्यामुळे दोन्ही क्षेत्राच्या मंजूर विकास योजना एकत्रित कराव्यात असे निर्देश आहेत. सदरची कार्यवाही दिनांक 28/12/2020 नुसार कामाची निश्चिती व मंजूरीनुसार प्रदान केली आहे. त्यानुसार करावयाचे आहे. नाशिकच्या संस्थेने बेस प्लॅन तयार केलेला आहे. परंतु आज रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21(2) च्या अनुषंगाने कलम 23(1) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्राकरीता सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करावा लागतो. यानंतर सुधारीत विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करणेकरीता त्या क्षेत्राचे सुधारीत विकास योजनेचे प्रस्ताव तयार करणेकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" यांची नेमणूक करण्यासाठी आपण शासनाकडे मागणी करणार आहोत.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने विकास योजना तयार

करणेकरीता शासनामार्फत विकास योजना कार्यालय (डी.पी.युनिट) मागणी व इरादा जाहीर करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** या योजनेत टाईम लिमीट वगैरे काही आहे का. त्या युनिट बरोबर महानगरपालिकेचे कोणी अधिकारी आहेत का.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आपल्या महानगरपालिकेचे अधिकारी राहणार आहेत. खाजगी एजन्सीसाठी फक्त मदत करणार. रोड मार्कींग, पॅटर्न ठरविणे हे काम शासनाचे अधिकारी करणार आहेत. दोन्ही हद्दीसाठी एकत्रित आराखडा करावा लागणार आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** काय काम होणार आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-**राजपत्रामधे इरादाजाहिर केल्या नंतर शासनाने नियुक्त केलेल्या नगररचना अधिकारी मार्फत सहा महिन्याच्या आत जी..आर.एस. सिस्टीमने तयार केलेला विद्यमान जमिन वापर नकाशा करुन महानगरपालिकेस हस्तांतरित करणे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23(2) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील सुधारीत योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व सहाय्यक संचालक नगररचना यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, अहमदनगर महानगरपालिका कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यांत येणार आहे. त्यावर एक महिन्याच्या मुदतीत दुरुस्ती सुचविता येणार आहे. त्याचे स्वरुप मुळ हद्द + वाढीव हद्द राहणार आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** हद्द वाढणार का.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** हद्द वाढणार नाही .

**मा.श्री.कुमार वाकळे :-** नालेगांव केडगांव बोल्हेगावचा काही भाग शिल्लक आहे. उरलेले क्षेत्र फार कमी आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** महानगरपालिकेतर्फे नगररचना अधिकारी 20 वर्षानंतर आपली लोकसंख्या किती राहणार याचा विचार करुन विकास आराखडा तयार करण्यांत येणार आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** हद्दवाढीचा ठराव करावा लागत असेल तर तो करावा. क्षेत्र कमी जास्त झाले तर भविष्याचा विचार करुन ठराव घ्यावा. रिझर्वेशन येणार, कटींग येणार, ग्रामपंचायतीचे ले आऊट आपल्याकडे येणार. महानगरपालिकेच्या कायद्यात ते मद्य होतील. हा विषय मंजूर आहेच पण ज्या महानगरपालिका हद्दीला लागुन ग्रामपंचायती आहेत. त्यांची परिस्थिती खराब आहे. हद्दवाढ झाल्यास मद्य होईल. ज्या ठिकाणी पाईपलाईन टाकले त्याला लेव्हल नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आपण अभिव्यासातील अंतर्गत सुधारणा अंतर्गत झालेल्या कामाबाबत शहर अभियंत्याचे प्रमाणपत्र घेतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ड्रेनेजचे काम आपल्या कडेच ठेवावे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आपल्या मार्फत करायचे असेल तर धोरणात्मक निर्णय म्हणुन महानगरपालिकेचा ठराव करावा लागेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** रस्ता त्यांचेकडे राहीला तर हरकत नाही. ड्रेनेजलाईन आपल्याकडे घ्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** ओपन स्पेसच्या विषया बाबत स्टडींग ऑर्डर करणार आहोत.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** ओपन स्पेसला संरक्षक भिंत करुन घ्या. समावेश करा. प्लींथ पर्यत UCR चा उल्लेख करा व त्यानंतर फेचिंग करण्यात यावे.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** कल्याण रोड बालाजीनगर मधील आरक्षणा बाबत मी पत्र दिले.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आरक्षण घरावर पडले यात सर्व रेक्टीफाय होतील.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** स.नं.27/1 पै. सावेडी या ठिकाणी घरावर आरक्षण टाकले. चाहुराणा बु.येथील स.नं. 107/5/6 मंजूर एन.ए.ले आऊट पै. प्लॉट नंबर 1 ते5 यावर चुकीने टाकलेले आरक्षण दुरुस्त करा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** नविन विकास आराखडा तयार करतांना सर्व चुका /त्रुटी यांचे दुरुस्ती करण्यात येते.

**मा.महापौर मह्रम :-** चुकून टाकलेले आरक्षण विकास आराखडा करतांना दुरुस्त करण्यांत यावे.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** 6 मीटर रस्ते भविष्यामधे 9.0 मी. करण्यात येतील का?

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** आयुक्तांकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. मा. आयुक्ताचे मान्यतेने धोरणात्मक निर्णय महासभेने घ्यावा. जुने रस्ते दोन्हीबाजुनी दिड मीटर वाईडींग दीड मीटर एफएसआय देवू.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** डी.पी.रोड मोकळा करुन घेत नाही. मी पत्र दिले दोन रोड थेट झाले पाहीजे. रस्ता मोकळा करा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** करुन घेतो.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** ले-आऊट झाला 1984 चा आहे. डी.पी.रोड, दुस-याच्या क्षेत्रात नेवून टाकला आहे. मी पत्र दिले त्यावर कारवाई का करीत नाही. पारीजात चौक, एकविरा चौक, स्ट्रेट आहेत. तारकपूर रोड चा चौक युटर्न का करता.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** 15 दिवसात कार्यवाही होईल.

**मा.ड्ॉ.श्री.सागर बोरुडे :-** बरेच लोक भोगवटा प्रमाणपत्र घेत नाहीत. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** मालमत्ता विभागामार्फत सेल तयार करुन संबंधितांना नोटीस देवून कार्यवाही करावी लागेल. विशेष सेल तयार करणेसाठी आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात येइल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ड्रेनेज लाईनचा विचार करुन आयुक्तांनी निर्णय घ्यावा. त्यांनी जे पाईप टाकले त्याला लेव्हल नसते. मेन लाईन पर्यत पाणी येत नाही. ले आऊट धारकाकडे न ठेवता पालिके मार्फत झाले तर बरे होईल. ते लोक कोणत्याही प्रकारचे झाकण टाकतात पाईप निकृष्ठ प्रकारचे वापरतात. ले आऊट मधील ड्रेनेज लाईनचे काम महानगरपालिकेकडे घ्या. रस्ता लाईट त्यांचेकडे राहू द्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** चर्चेनुसार प्रस्ताव महासभेसमोर ठेवतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** हद्दवाढीचा प्रस्ताव तयार करा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** प्रस्ताव तयार करतो आयुक्तांच्या समोर ठेवतो.

**मा.महापौर मह्रम :-** विषय क्रमांक 44 मंजूर ऑफीस रिपोर्ट मंजूर. सदस्यांनी मांडलेल्या सुचना विचारात घेणे.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** लाईटचे काम पूर्ण झाले. मागच्या सभेत प्रश्न विचारला नेमके काय चालले. एजन्सीला महिन्याला किती रक्कम देतो. महिन्याला किती विजबील बचत होते.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** पथदिव्यांचा प्रकल्पचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे. काम करणा-या एजन्सीला एक रुपयाही महानगरपालिकेने दिलेला नाही. विज बचती संदर्भात अॅनेलिसेसची तपासणी चालू आहे.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** आपले दिवे जमा केले का.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** जमा केलेले नाही.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** काही ठिकाणी फिटींग लागल्या त्या बंद आहेत. त्या रिप्लेस करुन द्यायला सांगा अनेक ठिकाणी फिटींग नाहीत.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** पुर्ण शहरात आठशे फिटींगची डिमांड दिली आहे. परंतु अजुन मटेरियल आले नाही.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** पाईपलाईन रोड वर फिटींग बंद आहे. आपल्या पालिकेचे वायरमनला सर्व्हे करायला सांगा.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** कोठे अजुन करायला पाहीजे तपासायला सांगा. डिमींग

करतो की नाही हे चेक करता का तुम्ही.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** पुर्ण बंद होण्याच्या तक्रारी आहेत. ओव्हर लोड मुळे या घटना होतात. डिमींगच्या बाबतीत एक टीम तयार करा.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** नविन रहिवासी भाग तयार झाला त्या ठिकाणी फिटींगा बसविणार का.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** निविदे मध्ये एक्ट्रॉ फिटींगची तरतुद आहे. दोन तीन दिवसात मटेरियल येणार आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** आमच्या प्रभागात ब-याच ठिकाणी जुन्या फिटींगा आहेत. तो ठेकेदार दाद देत नाही. ज्या ठिकाणी लावायच्या त्याठिकाणी नविन फिटींग न बसविल्यामुळे लोकांचा गैरसमज होतो आहे. त्या ठेकेदाराला बोलवा संपूर्ण शहरात बसवायच्या राहिल्या असतील त्या फिटींगा बसवा. जोशी यांचे ऐकत नसतील तर तसे सांगा. तो फक्त खेळवतो आहे.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** ४०० फिटींगा बाबत त्याला कळवले आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** नविन ठिकाणी फिटींग बसवल्या नंतर ;;;;

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** संबंधित वायरमनला सूचना देवू.

**मा.महापौर मह्रम :-** तुम्ही स्वतः फॉलोअप घ्या ब-याच ठिकाणी लाईट बंद आहेत.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** वीजबिल बचत होते का.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :-** तपासणीचे काम चालू आहे. ४०० फिटींगा बदलायचे काम व्हायचे आहे. थोडे लाईट बिलचे प्रमाण कमी झाले आहे. त्रयस्थ एजन्सी नेमण्याचे पत्र दिले आहे. एक ते दोन महिन्यात अहवाल देतो.

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :-** सातवे वेतन मंजूर आहे की नाही घोषणा झाली त्याची माहिती द्या.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :-** 7 व्या वेतन आयोगाचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबीत आहे.

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :-** फॉलोअप घेतला का. सफाई कामगारांना खूप अपेक्षा आहे.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :-** शासनाने एक त्रूटी आढली आहे. 7 व्या वेतन आयोगाचा खर्च कसा भागवणार याबाबत अहवाल सादर करणार आहोत.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** स्थायी समितीमध्ये आस्थापनांना कर लावण्याचा विषय होता. 2006 ला शासन निर्णय झाला. त्यानंतर आजपर्यंत अंमलबजावणी का झाली नाही.

यात कोणत्या विभागाची चूक आहे. 32 कोटीचे महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे.

**मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :-** चौकशी करुन सादर करु.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** आपण विभाग कार्यालयांना भेटी दिल्या. कर्मचा-यांना शिस्त लावली पाहीजे. कोणत्या अधिका-यांना नोटीस दिल्या का त्याची माहिती द्यावी.

**आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :-** संबंधित अधिका-यांना नोटीस देण्यांत आल्या. यापुढे वेळेवर उपस्थित राहणेबाबत समज देण्यांत आली. अधिका-यांची नांवे सभेमध्ये माहिती घेवून सांगतो.

**मा.महापौर महोदय :-** ऑफीस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर नगरपरिषदेची स्थापना 1854 साली झालेली असुन 30 जुन,2003 रोजी पासून अहमदनगर महानगरपालिका म्हणून कार्यरत असून मुळ हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04 जुलै, 2005 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे. व दिनांक 22 08 2005 पासून अंमलात आलेला आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेची दिनांक 01 जुलै, 1999 रोजी हद्दवाढ झालेली असून अहमदनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/04/2012 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे. व दिनांक 15/05/2012 पासून अंमलात आलेला आहे.

सबब, अहमदनगर महानगरपालिकेच्या मूळ हद्दीतील क्षेत्राचा मंजूर विकास आराखडा अंमलात येवून दिनांक 22/08/2022 रोजी 17 वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला असल्याने शासन निर्देश जा.क्र.टीपीएस 1810/83/प्र.क्र.2115/2010/नवि-13 दिनांक 02/02/2012 अन्वये ज्या विकास योजना अंमलात येवून 17 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. अशा सर्व नियोजन प्राधिकरणांच्या सुधारीत विकास योजना भौगोलिक माहिती प्रणालीच्या आधारे द्रुतगती पध्दतीने तयार करण्यासाठी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.टीपीएस-1818/1489/प्र.क्रं.303/18/नवि-13 दिनांक 25/01/2019 शुध्दीपत्रक 17/06/2019 अन्वये निर्गमित केलेले आहे.

त्या अनुषंगाने शासन निर्णय क्रमांक टीपीएस-1818/1647/प्र.क्रं.252/18/नवि-13, दिनांक 25/01/2019 रोजीच्या शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मूळ हद्द+ वाढीव हद्द विकास योजना मंजुरीच्या तारखेमध्ये बदल पडलेला असतो. त्यामुळे दोन्ही क्षेत्राच्या मंजूर विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही करतांना 17 वर्षाचा कालावधी

पुर्ण होण्याची तारीख व वर्ष वेगवेगळे असते.

त्यामुळे अशा मूळ व वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची प्रक्रीया देखील वेगवेगळया वेळी सुरु करण्यांत येते. मूळ व वाढीव हद्द क्षेत्राच्या विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही दोन टप्प्यात करतांना विकास योजना प्रस्तावांचे नियोजन करते वेळी ब-याच अडचणी येवू शकतात व ते नियोजन देखील योग्य प्रकारे होवू शकत नाही. सबब नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्रात मुळ व वाढीव हद्द अशा दोन भागांत विकास योजना मंजूर असल्यास पैकी कोणत्याही एका क्षेत्राची विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही सुरु करतांना दुस-या क्षेत्राची विकास योजना देखील त्यासोबतच सुधारीत करणेची कार्यवाही झाल्यास, अशी एकत्रितपणे विकास योजना सुधारीत करतांना नियोजन प्राधिकरणाच्या संपूर्ण क्षेत्राचा विचार होवून विकास योजना प्रस्तावाचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे होवू शकेल व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्प्यावर आणता येईल. याबाबीचा विचार करुन राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना उक्त अधिनियमाचे कलम 154 अन्वये खालील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

राज्यातील सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती/विशेष नियोजन प्राधिकरणे अथवा अन्य नियोजन प्राधिकरणे यांनी क्षेत्रात जर मूळ व वाढीव हद्द क्षेत्राच्या अशा दोन भागांत विकास योजना मंजूर असतील तर अशा मंजूर विकास योजनांपैकी कोणत्याही एका भागांची विकास योजना मंजूर होऊन अंमलात आल्याच्या दिनांकापासून 20 वर्षे पुर्ण होण्यापूर्वी 3 वर्ष अगोदर त्या भागाची विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया सुरु करतांना त्यावेळी नियोजन प्राधिकरणाच्या संपूर्ण क्षेत्राचा विचार होऊन विकास योजना प्रस्तावांचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करणे शक्य व्हावे व भविष्यात देखील विकास योजना सुधारीत करणेची कार्यवाही एकाच टप्प्यावर होण्याच्या दृष्टीने, जरी दुस-या भागाची विकास योजना मंजूर होऊन अंमलात आल्याच्या दिनांकापासून कितीही कालावधी झालेला असेल तरी देखील अशा नियोजन प्राधिकरणांनी संबंधित दोन्ही भागांच्या विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रिया एकत्रितपणे हाती घ्यावी.

त्याप्रमाणे सदरची कार्यवाही ही खाजगी संस्थेमार्फत करुन घेणे आवश्यक असल्याने अहमदनगर महानगरपालिका मे.स्थायी समिती सभा क्रमांक 5 विषय क्रमांक 74 दिनांक 28/12/2020 नुसार कामाची निश्चिती व मंजूरी प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेकरीता विद्यमान जमीन वापर (Existing Land Use) चे सर्व्हेक्षण खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यांत आले असून सदर काम अंतिम टप्यात असुन अस्तीत्वातील जमीन वापर नकाशा तयार करुन सादर केलेला आहे.

सबब महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21 (2) च्या अनुषंगाने कलम 23 (1) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्राकरीता सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सदर ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23 (2) च्या नुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील सुधारीत विकास योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व सहाय्यक संचालक, नगररचना यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, अहमदनगर महानगरपालिका कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यांत यावा.

सुधारीत विकास योजना तयार करण्याचा महानगरपालिकेचा इरादा, महाराष्ट्र शासन राजपत्रात व स्थानिक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात सूचनेव्दारे प्रसिध्द करणेंत यावा. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून 60 दिवसांच्या कालावधीत प्राप्त होणा-या नागरिकांच्या सूचना/हरकतींचा विचार, सुधारीत विकास योजना करतांना करण्यांत यावा.

तसेच सुधारीत विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करणेकरीता, त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करण्याकरीता, त्या क्षेत्राचे सुधारीत विकास योजनेचे प्रस्ताव तयार करण्याकरीता व त्या संबंधी इतर सर्व कामे करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकरी" यांच्या नियुक्तीचे औपचारीक आदेश, आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी पारीत करावे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलीक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने विकास योजना तयार करणेकरीता शासनामार्फत विकास योजना कार्यालय (डी.पी.युनिट) मागविणे.

त्याअनुषंगाने सदर वरील विषय धोरणात्मक असल्याने धोरणात्मक निर्णयासाठी मा.महासभेपुढे मंजूरीस्तव सादर झालेले आहे.

कार्यालयीन अहवालानुसार व मा.आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सुधारीत विकास योजना तयार करण्याकरीता शासनामार्फत विकास योजना कार्यालय (डी.पी.युनिट) मागविणे या बाबत शासन स्तरावर कार्यवाही करणे,

तसेच त्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 अन्वये इरादा जाहीर करणे तसेच "नगररचना अधिकरी" यांची नियुक्ती करणे अधिकार मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना देण्यांत येत आहे. तदसंबंधी लागणा-या सर्व खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

काही चुका किंवा त्रुटी असतील त्याही दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.कुमार बबनराव वाकळे

अनुमोदक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०६** **प्रस्ताव क्रमांक : ४५** **दिनांक :- १७/०२/२०२३**

---

**--प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

1) सौ.आशा शिवाजीराव कराळे माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

2) सौ.लताबाई बलभिम शेळके माझी तब्येत बरी नसल्याने दिनांक 19/10/2023 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- पाईपलाईन रोड भागातील पाणीपुरवठयाचे अधिकारी यांना बोलवा.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :- परवा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौथरा उभारणीबाबत भुमीपुजन कार्यक्रम आहे आपण सर्वांनी कार्यक्रमास आवर्जुन उपस्थित रहावे हि विनंती.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- सर्व पाईपलाईन रोड व बोल्हेगांव येथील संपुर्ण पाणीपुरवठा विस्कळीत आहे.

श्री.सातपुते, इंजिनिअर पा.पु. :- मुळाडमम वरील 1 पंप बंद होता टाकीतील पाणी घ्यायचे थांबवले. शटडाउन घेतलेने वसंत टेकडीला पाणी पुरवठा झाला नाही.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- वसंतटेकडी टाकीवर कालच पाहणी केली टाकीवरील आटे परत कमी केलेले दिसुन आले मी तुम्हाला बसू देणार नाही पाईपलाईनचा पाणी पुरवठा सुरळीत झाला पाहीजे.

मा.श्री.संपत बारस्कर :- तुम्ही काहीच कामे करीत नाही मी पत्र दिले आहे.

श्री.सातपुते, इंजिनिअर पा.पु. :- संपुर्ण शहराचे पाणीपुरवठ्याला मी जबाबदार नाही. सावेडी भागापुरते नियोजन मी करतो सार्वजनिक वितरण व्यवस्था फक्त मी पाहतो. टाक्या भरल्या की नाही आटे कमी झाले हे मी पहात नाही.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- दरवेळेस टाकीवर जावे लागते आटे कमी कोण करते ते कळाले पाहीजे. नागरिकांचे रोषास आम्हाला सामारे जावे लागते सकाळी 5.00 पासुन फोन चालू होतात. आम्ही वैयक्तीक टँकर चालू केले आहेत.

मा.श्री.संपत बारस्कर :- आमचा जो पर्यंत प्रश्न मार्गी लागत नाही तो पर्यंत विनंती कोणी मध्ये बोलू नये. जोपर्यंत जबाबदार व्यक्ती जबाबदारीने उत्तर देत नाही तोपर्यंत सभा चालू देणार नाही.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- आम्हाला पाणी प्रश्नावर सोल्युशन द्या.

मा.श्री.गणेश कवडे :- 17 वॉर्ड मधील एकही वॉर्ड सुखी नाही. सर्वांना पाण्याचा प्रॉब्लेम आहे.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :- आज पाणी पुरवठा विभाग प्रमुख नाही ते आल्यानंतर सविस्तर माहिती देतील.

मा.श्री.संपत बारस्कर :- उद्या आमच्या वॉर्डात मा.आयुक्त, मा.महापौर, मा.उपमहापौर, संबंधित पाणी पुरवठा अधिकारी यांनी वॉर्डात व्हीजीट करावी सर्व

कॉलनीत व्हीजीट करावी लागेल. असे आश्वासन द्यावे त्याशिवाय आम्ही खाली बसणार नाही.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :- 19 किंवा 20 तारखेला येवू. शनिवार, रविवार छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे भुमिपुजन नियोजीत आहे.

मा.महापौर मॅडम : निकम साहेबांना येवू द्या आपण 20 तारखेला पाहणी करु.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- मागच्या मिटींग मध्येच पाणी पुरवठा योजनाचे किरकोळ काम राहीले आहे अशी माहिती दिली. परंतु अजून काम पूर्ण झाले नाही. संपूर्ण शहरास वेठीस धरले जात आहे. पंप येण्याची मुदत 10 जानेवारी पर्यंत होती. 10 फेब्रुवारी झाली तरी अजुन पंप आले नाही. पंप आले का ? कोणाचा श्रेय घेण्याचा प्रश्न आहे का. पाणी का येत नाही.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :- श्रेयासाठी आम्ही काही करत नाही त्यासाठी पब्लीकला वेठीस धरत नाही.

मा.सौ.दिपाली बारस्कर :- अमृत योजनेत मा.आयुक्तांनी लक्ष घालावे.

मा.सौ.सुवर्णा जाधव :- वॉर्ड क्रमांक 15 मध्ये ही पाणी येत नाही.

श्री.गाडळकर, इंजिनिअर :- अमृत पाणीपुरवठा योजनेचे पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. पंप चाचणी झाली मोटर चाचणी या महिना अखेर होईल. त्यानंतर 4-5 दिवसात पाणी पुरवठा सुरळीत होईल.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- सर्व कामे केंव्हा पुर्ण होतील.

श्री.गाडळकर, इंजिनिअर :- मार्च अखेर सर्व कामे पुर्ण होतील.

मा.श्री.महेंद्र गंधे :- मनुष्यबळ कमी आहे म्हणतात. 175 पदे भरणार होते त्याची माहिती द्या.

मा.आयुक्त श्री.जावळे साहेब :- 175 पदे भरण्यासाठी प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर केला आहे. मा.शासनाकडून प्रस्तावास मंजूरी मिळाली आहे. टीसीएस च्या माध्यमातुन पदे भरण्यांत येतील.

मा.श्री.महेंद्र गंधे :- मानधनावरी काम करणा-या कर्मचा-यांचा विचार होणार आहे का ?

मा.श्री.कुमार वाकळे :- परभणी महानगरपालिकेतील मानधनावरील कर्मचा-यांना महानगरपालिकेने कायम सेवेत घेतले. त्याप्रमाणे आपल्या महानगरपालिकेत निर्णय घ्यावा.

मा.श्री.महेंद्र गंधे :- आपल्याकडील आज कार्यरत कर्मचा-यांचे वय झालेले आहे. वयोमर्यादा ओलांडल्यामुळे इतर ठिकाणीही त्यांना नोकरी लागू शकत नाही त्यामुळे सध्या कार्यरत मानधनावरील कर्मचारी यांचा विचार नविन भरतीत करण्यांत यावा.

मा.श्री.अविनाश घुले :- त्यांना कामाचा अनुभव आहे. नविन कर्मचारी घेतल्यानंतर त्यांना कामाची माहिती होण्यास वेळ जाईल. आवश्यक असल्यास महानगरपालिकेचा ठराव करु. त्यांना प्राधान्यक्रम द्यावा. त्यांचे अर्धे आयुष्य येथे गेले आहे.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :- आयुक्तांनी या बाबत पॉझिटीव्ह विचार करुन या लोकांना कसे घेता येईल हे तपासुन पहावे त्यांचे काम करण्याचा प्रयत्न करावा.

मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :- मानधनावरील महानगरपालिकेकडील कर्मचा-यांचा विचार करु.

मा.श्री.संपत बारस्कर :- विषय क्रमांक 40 मध्ये दुरुस्ती करण्यांत यावी. टायपिंग मिस्टेक मध्ये कजबे झाले आहे त्याचे "कसबेनगर" ऐवजी "कजबेनगर" अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

मा.श्री.महेंद्र गंधे :- कच-याची विल्हेवाट लावण्याची सोय करण्यांत यावी.

मा.महापौर मॅडम :- विषय क्रमांक 30 चे वाचन करा.

वाचन केले.

मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :- नामकरणाचे सर्व विषय मंजूर करावेत.

मा.महापौर मॅडम :- नामकरणाचे सर्व विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

मा.सौ.रुपाली वारे :- माउली संकुल परिसराला माउली संकुल नाव द्यावे त्या परिसरात विविध कार्यक्रम होतात.

विषय क्रमांक 44 चे वाचन करण्यांत यावे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- या विषयाची माहिती सभागृहाला द्यावी नेमके आपण काय करणार आहात.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- अहमदनगर नगरपरिषदेची स्थापना 1854 साली झालेली असून 30 जून 2003 रोजीपासून अहमदनगर महानगरपालिका म्हणुन कार्यरत असुन मूळ हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/07/2005 रोजी

शासनाकडून मंजूर झालेला आहे व दिनांक 22/08/2005 पासून अंमलात आलेला आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिकेची दिनांक 01 जुलै 1999 रोजी हद्दवाढ झालेली असुन अहमदनगर महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीचा विकास योजना आराखडा दिनांक 04/04/2012 रोजी शासनाकडून मंजूर झालेला आहे. व दिनांक 05/05/2012 पासून अंमलात आलेला आहे. दिनांक 15 10 2010 चे शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ हद्द + वाढीव हद्द विकास योजना मंजूरीच्या तारखेमध्ये व वर्षामध्ये बदल पडलेला असतो त्यामुळे दोन्ही क्षेत्राच्या मंजूर विकास योजना एकत्रित कराव्यात असे निर्देश आहेत. सदरची कार्यवाही दिनांक 28 12 2020 नुसार कामाची निश्चिती व मंजूरीनुसार प्रदान केली आहे. त्यानुसार करावयाचे आहे. नाशिकच्या संस्थेने बेस प्लॅन तयार केलेला आहे. परंतु आज रोजी

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 21(2) च्या अनुषंगाने कलम 23(1) अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्राकरीता सुधारीत विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करावा लागतो. यानंतर सुधारीत विकास योजना क्षेत्राचे सर्व्हेक्षण करण्याकरीता त्याचा विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करुन महानगरपालिकेकडे सादर करणेकरीता त्या क्षेत्राचे सुधारीत विकास योजनेचे प्रस्ताव तयार करणेकरीता व त्यासंबंधी इतर सर्व कामे करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 24 अन्वये "नगररचना अधिकारी" यांची नेमणूक करण्यासाठी आपण शासनाकडे मागणी करणार आहोत.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या मुळ व वाढीव हद्दीतील क्षेत्राचा भौगोलिक माहिती प्रणालिच्या आधारे एकत्रित सुधारीत विकास आराखडा तयार करणेसाठी महानगरपालिकेकडे आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ नसल्याने विकास योजना तयार करणेकरीता शासनामार्फत विकास योजना कार्यालय (डी.पी.युनिट) मागणी व इरादा जाहीर करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- या योजनेत टाईम लिमीट वगैरे काही आहे का. त्या युनिट बरोबर महानगरपालिकेचे कोणी अधिकारी आहेत का.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- आपल्या महानगरपालिकेचे अधिकारी राहणार आहेत. खाजगी एजन्सीसाठी फक्त मदत करणार. रोड मार्कींग, पॅटर्न ठरविणे हे काम

शासनाचे अधिकारी करणार आहेत. दोन्ही हद्दीसाठी एकत्रित आराखडा करावा लागणार आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- काय काम होणार आहे.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- सहा महिन्याच्या आत डी.आर. सिस्टीमने तयार केलेला इरादा सादर करुन महानगरपालिकेस हॅण्ड ओव्हर करणार. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 23(2) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील सुधारीत योजनेमध्ये समाविष्ठ असलेल्या क्षेत्राचा फक्त हद्द दर्शविणारा व सहाय्यक संचालक नगररचना यांनी स्वाक्षांकित केलेला नकाशा, अहमदनगर महानगरपालिका कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यांत येणार आहे. त्यावर एक महिन्याच्या मुदतीत दुरुस्ती सुचविता येणार आहे. त्याचे स्वरुप मुळ हद्द + वाढीव हद्द राहणार आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- हद्द वाढणार का. क्षेत्र मध्ये होईल का.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- हद्द वाढणार नाही क्षेत्र मध्ये होईल.

मा.श्री.कुमार वाकळे :- नालेगांव केडगांव बोल्हेगावचा काही भाग शिल्लक आहे. उरलेले क्षेत्र फार कमी आहे.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- 20 वर्षानंतर आपली लोकसंख्या किती राहणार याचा विचार करुन आराखडा तयार करण्यांत येणार आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- हद्दवाढीचा ठराव करावा लागत असेल तर तो करावा. क्षेत्र कमी जास्त झाले तर भविष्याचा विचार करुन ठराव घ्यावा. रिझर्वेशन येणार, कटींग येणार, ग्रामपंचायतीचे ले आउट आपल्याकडे येणार. महानगरपालिकेच्या कायद्यात ते मध्ये होतील. हा विषय मंजूर आहेच पण ज्या महानगरपालिका हद्दीला लागुन ग्रामपंचायती आहेत. त्यांची परिस्थिती खराब आहे. हद्दवाढ झाल्यास मध्ये होईल. ज्या ठिकाणी पाईपलाईन टाकले त्याला लेव्हल नाही.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- आपण झालेल्या कामाबाबत शहर अभियंत्याचे प्रमाणपत्र घेतो.

मा.श्री.कुमार वाकळे :- ड्रेनेजचे काम आपल्या कडेच ठेवावे.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- आपल्या मार्फत करायचे असेल तर महानगरपालिकेचा ठराव करावा लागेल.

मा.श्री.कुमार वाकळे :- रस्ता त्यांचेकडे राहीला तर हरकत नाही. ड्रेनेजलाईन आपल्याकडे घ्या.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- ओपन स्पेसच्या विषया बाबत स्टडींग ऑर्डर करणार आहोत.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- ओपन स्पेसची दुरुस्ती करुन घ्या. चेंजींगचा समावेश करा. प्लींथ पर्यत UCR चा उल्लेख करा.

मा.श्री.सचिन शिंदे :- कल्याण रोड बालाजीनगर मधील आरक्षणा बाबत मी पत्र दिले.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- आरक्षण घरावर पडले यात सर्व रेक्टीफाय होतील.

मा.श्री.सचिन शिंदे :- स.नं.27/1 पै. सावेडी या ठिकाणी घरावर आरक्षण टाकले. चाहुराणा बु.येथील स.नं. 107/5/6 मंजूर एन.ए.ले आउट पै. प्लॉट नंबर 1 ते5 यावर चुकीने टाकलेले आरक्षण दुरुस्त करा.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- नविन

मा.श्री.रामदास आंधळे :- 6 मीटर रोडवरील ,,,,,,,,

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- आयुक्तांकडे निर्णय घेतला. 9 मीटर आवश्यक आहे. धोरणात्मक निर्णय महासभेने घ्यावा. जुने रस्ते दीड मीटर वाईंडींग करुन घ्या. दीड मीटर एफएसआय देवू.

मा.श्री.रामदास आंधळे :- डी.पी.रोड मोकळा करुन घेत नाही.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- करुन घेतो.

मा.श्री.रामदास आंधळे :- ले-आउट झाला 1984 चा आहे. डी.पी.रोड दुस-याच्या क्षेत्रात नेवून टाकला आहे. मी पत्र दिले त्यावर कारवाई का करीत नाही. पारीजात चौक, एकविरा चौक, स्ट्रेट आहेत. तारकपूर रोड चा चौक युटर्न का करता. मी पत्र दिले दोन रोड थेट झाले पाहीजे. रस्ता मोकळा करा.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- 15 दिवसात कार्यवाही होईल.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- बरेच लोक भोगवटा प्रमाणपत्र घेत नाहीत. महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होते.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- मालमत्ता विभागामार्फत सेल तयार करुन

संबंधितांना नोटीस देवून म्हणणे मागवावे लागेल. महासभेने आणि आयुक्त यांनी निर्णय घ्यावा लागेल.

मा.श्री.कुमार वाकळे :- ड्रेनेज लाईनचा विचार करुन आयुक्तांनी निर्णय घ्यावा. त्यांनी जे पाईप टाकले त्याला लेव्हल नसते. मेन लाईन पर्यत पाणी येत नाही. ले आउट धारकाकडे न ठेवता पालिके मार्फत झाले तर बरे होईल. ते लोक कोणत्याही प्रकारचे झाकण टाकतात पाईप निकृष्ठ प्रकारचे वापरतात. ले आउट मधील ड्रेनेज लाईनचे काम महानगरपालिकेकडे घ्या. रस्ता लाईट त्यांचेकडे राहू द्या.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- चर्चेनुसार प्रस्ताव महासभेसमोर ठेवतो.

मा.श्री.कुमार वाकळे :- हद्दवाढीचा प्रस्ताव तयार करा.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- प्रस्ताव तयार करतो आयुक्तांच्या समोर ठेवतो.

मा.महापौर मह्रम :- विषय क्रमांक 44 मंजूर ऑफीस रिपोर्ट मंजूर. सदस्यांनी मांडलेल्या सुचना विचारात घेणे.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- लाईटचे काम पूर्ण झाले. मागच्या सभेत प्रश्न विचारला नेमके काय चालले. एजन्सीला महिन्याला किती रक्कम देतो. महिन्याला किती विजबील बचत होते.

श्री.वैभव जोशी :- पथदिव्यांचा प्रकल्पचे काम जवळ जवळ पूर्ण झाले आहे. काम करणा-या एजन्सीला एक रुपयाही महानगरपालिकेने दिलेला नाही. विज बचती संदर्भात अॅनेलिसेसची तपासणी चालू आहे.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- आपले दिवे जमा केले का.

श्री.वैभव जोशी :- जमा केलेले नाही.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- काही ठिकाणी फिटींग लागल्या त्या बंद आहेत. त्या रिप्लेस करुन द्यायला सांगा अनेक ठिकाणी फिटींग नाहीत.

श्री.वैभव जोशी :- पुर्ण शहरात आठशे फिटींगची डिमांड दिली आहे. परंतु अजुन मटेरियल आले नाही.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- पाईपलाईन रोड वर फिटींग बंद आहे. आपल्या पालिकेचे वायरमनला सर्व्हे करायला सांगा.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- कोठे अजुन करायला पाहीजे तपासायला सांगा. डिमींग करतो की नाही हे चेक करता का तुम्ही.

श्री.वैभव जोशी :- पुर्ण बंद होण्याच्या तक्रारी आहेत. ओव्हर लोड मुळे या घटना होतात. डिमींगच्या बाबतीत एक टीम तयार करा.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- नविन रहिवासी भाग तयार झाला त्या ठिकाणी फिटींगा बसविणार का.

श्री.वैभव जोशी :- निविदे मध्ये एक्ट्रॉ फिटींगची तरतुद आहे. दोन तीन दिवसात मटेरियल येणार आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- आमच्या प्रभागात ब-याच ठिकाणी जुन्या फिटींगा आहेत. तो ठेकेदार दाद देत नाही. ज्या ठिकाणी लावायच्या त्याठिकाणी नविन फिटींग न बसविल्यामुळे लोकांचा गैरसमज होतो आहे. त्या ठेकेदाराला बोलवा संपूर्ण शहरात बसवायच्या राहिल्या असतील त्या फिटींगा बसवा. जोशी यांचे ऐकत नसतील तर तसे सांगा. तो फक्त खेळवतो आहे.

श्री.वैभव जोशी :- ८०० फिटींगा बाबत त्याला कळवले आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- नविन ठिकाणी फिटींग बसवल्या नंतर ;;;;

श्री.वैभव जोशी :- संबंधित वायरमनला सूचना देवू.

मा.महापौर मह्यम :- तुम्ही स्वत: फॉलोअप घ्या ब-याच ठिकाणी लाईट बंद आहेत.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- वीजबिल बचत होते का.

श्री.वैभव जोशी :- तपासणीचे काम चालू आहे. ८०० फिटींगा बदलायचे काम व्हायचे आहे. थोडे लाईट बिलचे प्रमाण कमी झाले आहे. त्रयस्थ एजन्सी नेमण्याचे पत्र दिले आहे. एक ते दोन महिन्यात अहवाल देतो.

मा.श्रीमती.कोतकर सुनिता :- सातवे वेतन मंजूर आहे की नाही घोषणा झाली त्याची माहिती द्या.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :- 7 व्या वेतन आयोगाचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबीत आहे.

मा.श्रीमती.कोतकर सुनिता :- फॉलोअप घेतला का. सफाई कामगारांना खूप अपेक्षा आहे.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :- शासनाने एक त्रूटी आढली आहे. 7 व्या वेतन आयोगाचा खर्च कसा भागवणार याबाबत अहवाल सादर करणार आहोत.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- स्थायी समितीमध्ये आस्थापनांना कर लावण्याचा विषय होता. 2006 ला शासन निर्णय झाला. त्यानंतर आजपर्यंत अंमलबजावणी का झाली नाही. यात कोणत्या विभागाची चूक आहे. 32 कोटीचे महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे.

मा.आयुक्त श्री.पंकज जावळे साहेब :- चौकशी करुन सादर करु.

मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :- आपण विभाग कार्यालयांना भेटी दिल्या. कर्मचा-यांना शिस्त लावली पाहीजे. कोणत्या अधिका-यांना नोटीस दिल्या का त्याची माहिती द्यावी.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.साबळे :- संबंधित अधिका-यांना नोटीस देण्यांत आल्या. यापुढे वेळेवर उपस्थित राहणेबाबत समज देण्यांत आली. अधिका-यांची नांवे सभेमध्ये माहिती घेवून सांगतो.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : १५/०२/२०२३

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सभा सुचना क्रमांक ०६ **शुक्रवार** दिनांक १७-०२-२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. तसेच सदर सभेकरीता फोटोग्राफरची व्यवस्था करण्यांत यावी. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ५) | श्रीमती.मेघना निकम, नगरसचिव विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
# नगरसचिव विभाग
---*---

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०५, शुक्रवार दि. १७/०२/२०२३ रोजीचा विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.-------------------------, | |
| २ | श्री.-------------------------, | |
| ३ | श्री.-------------------------, | |
| ४ | श्री.-------------------------, | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

नगरसचिव विभाग.- दिनांक : /०२/२०२३.

विषय : शुक्रवार दिनांक - १७/०२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता झालेल्या मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०५ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ५ शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.९९६०/- (अक्षरी रक्कम रुपये नउ हजार नउशे साठ फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या *** सभेचे चहा नाष्टा बील *** या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, शुक्रवार दिनांक १७/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती आठ सदस्यांची निवड करणेकामी मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली मा.विशेष सभा **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर
महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.